Shanti Education Society's
# A. G. Patil Polytechnic Institute, Solapur
**NBA ACCREDITED PROGRAMS**
(Approved by AICTE, New Delhi; Recognized by Govt. of Maharashtra; Affiliated to MSBTE, Mumbai)
ISO 9001:2015 CERTIFIED DTE Inst. Code : D6443 MSBTE Inst. Code : 0995

18(2/2A)2, Pratap Nagar, Opp. S.R.P. Camp, Vijapur Road, Solapur- 413008 (Maharashtra, India)
Ph.No.: 0217-2341899 E-mail: agppi.contact@gmail.com Web: www.agppi.edu.in

AGPPI/Admin./Internal/2025-26/119 Date: 26.11.2025

## सुचना

## "परमपुज्य महातपस्वी श्री कुमारस्वामीजी यांचे जीवन व कार्य" या विषयावर आयोजित परीक्षेस विद्यार्थ्यांनी सहभागी होण्याबाबत...

सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना कळविण्यात येते की, समाजात नैतिक मूल्यांचा ऱ्हास होत चालला असून आपल्या जिवनात नैतिक मुल्ये रूजावीत व सर्वांचे जिवन समृध्द् होऊन त्यायोगे निकोप समाजाची निर्मिती व्हावी या हेतूने आंतरराष्ट्रीय प्रार्थनायोग मंडळ, सोलापूर यांच्याद्वारे "परमपुज्य महातपस्वी श्री कुमारस्वामीजी यांचे जीवन व कार्य" या विषयावर रविवार, दि. २८.१२.२०२५ रोजी लेखी परीक्षेचे आयोजन करण्यात आले असून सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सदर परीक्षेत सहभागी व्हावे. सदर परीक्षेसंदर्भातील सविस्तर माहिती व नियमावलीचे परिपत्र सोबत जोडत असून सर्वांनी त्याचे अवलोकन करावे व परीक्षेस बसण्यास इच्छुकांनी आपली नांवे प्राध्यापिका सौ. एल. एस. बिराजदार (Mobile No. : 9421026650) यांच्याकडे मंगळवार, दि. ०२.१२.२०२५ पर्यंत नोंदवावीत, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

A. G. PATIL POLYTECHNIC INSTITUTE ★ SOLAPUR ★

डॉ. एम. ए. चौगुले
प्राचार्य
ए. जी. पाटील पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूट
सोलापूर.

प्रत :

1. VP
2. CE
3. CO
4. EE
5. EJ
6. ME
7. H&S
8. Library
9. Coordinator: Mrs. L.S. Birajdar
10. TPO
11. Academic Coordinator
12.. Admin.

॥ हे प्रभो प्रसीद ॐ॥ ॥ हे प्रभो प्रसीद ॐ॥ ॥ हे प्रभो प्रसीद ॐ॥



# आंतरराष्ट्रीय प्रार्थनायोग मंडळ, सोलापूर

आयोजित

# परमपूज्य महातपस्वी श्री कुमारस्वामीजी जीवन व कार्य या विषयावर परीक्षा

स्वामीजी हे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे विज्ञाननिष्ठ योगमहर्षी होते,शिवयोग व प्रार्थना योगाचे प्रणेते,जागतिक सर्वधर्म संमेलन पॅरिसचे अध्यक्ष, आंतरराष्ट्रीय विश्वधर्म संसद यांचेकडून परम धर्मचक्र देऊन सन्मानित; जागतिक विज्ञान व योग परिषद नवी दिल्ली येथे आमंत्रित, ख्रिश्चन धर्माचे सर्वोच्च धर्मगुरू पोल पॉल यांना ईस्टलिंग द्वारे शिवयोगाची अनुभूती दिली. स्वामीजींचा जागतिक कीर्तीचे तत्त्ववेत्ते, विचारवंत, वैज्ञानिक, धर्मगुरू यांचे कडून मोठी प्रशंसा केली, यामध्ये डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन, दलाई लामा, श्री श्री रविशंकर, श्री सिद्धेश्वर महास्वामी, ज्ञान योगाश्रम यांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या जीवनात नैतिक मूल्ये रुजावीत, त्यांचे जीवन समृद्ध व्हावे,त्यायोगे निकोप समाजाची निर्मिती व्हावी, या हेतूने हा एक अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे.तरी जास्तीत जास्त लोकांनी या उपक्रमात सहभागी व्हावे ही नम्र विनंती...

## बक्षिसांची विभागणी (संयुक्त तक्ता)

| बक्षिसाचा प्रकार | रक्कम (₹) | महाविद्यालयीन विद्यार्थी / खुला गट बक्षिसांची संख्या | माध्यमिक शाळा इ. ८ वी व ९ वी गट बक्षिसांची संख्या |
|---|---|---|---|
| प्रथम बक्षीस | १०,०००/- | ०१ | ०१ |
| द्वितीय बक्षीस | ७,५००/- | ०१ | ०१ |
| तृतीय बक्षीस | ५,०००/- | ०१ | ०१ |
| स्फूर्ती बक्षीस | १,५००/- | १० | १० |
| साधना बक्षीस | १,०००/- | १५ | १५ |

**परीक्षेची तारीख : रविवार दि.२८/१२/२०२५**

**परीक्षेची ठिकाण : शहरातील मध्यवर्ती ठिकाण**

संपर्क
राजेंद्र मायनाळ ९९२२९१२४३४
नागनाथ चौगुले ९५७९७१०१०९

## परीक्षेचे नियम

1. परीक्षा लेखी स्वरूपाची वस्तुनिष्ठ बहुपर्यायी/वर्णनात्मक स्वरूपाची असेल
2. प्रश्नपत्रिकाचा अभ्यासक्रम श्री राजेंद्र मायनाळ लिखित परमपूज्य महातपस्वी श्री कुमारस्वामीजी यांचे जीवन व कार्य या ग्रंथावर आधारित राहील.
3. परीक्षेचा दिनांक 28 डिसेंबर 2025 परीक्षेचे ठिकाण व वेळ नंतर जाहीर करण्यात येईल.
4. उत्तरपत्रिकेचे मूल्यमापन करून गुणवत्तेनुसार क्रमांक ठरविले जातील. परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.
5. परीक्षेची नोंदणी फी म्हणून स्वामीजींचे जीवन व कार्य हा ग्रंथ घेणे आवश्यक राहील ग्रंथाचे देणगी मूल्य रुपये 200 आहे
6. 15 डिसेंबर 2025 पूर्वी मुख्याध्यापक/प्राचार्य/आयोजित संस्था यांचेकडे नोंदणी करणे आवश्यक आहे
7. परीक्षार्थींनी परीक्षेपूर्वी पंधरा मिनिटे हजर राहणे आवश्यक आहे
8. निवड झालेल्या परीक्षार्थींना बक्षीसाची रक्कम व प्रशस्तीपत्र समारंभ पूर्वक प्रदान करण्यात येईल.



विनीत: राजेंद्र मायनाळ (अध्यक्ष) | नीलकंठ कोनापुरे (उपाध्यक्ष) | बाबासाहेब कुलकर्णी (सचिव)




Estd. 1984

।। हे प्रभो प्रसीद ॐ ।।

Public Trust Regd No. A779 (S)

# आंतरराष्ट्रीय प्रार्थनायोग मंडळ, सोलापूर

इंदिरा नगर पोस्ट ऑफिसजवळ, विजापूर रोड, सोलापूर - ४१३ ००४.

फोन : (०२१७) २६०७१९८. मो.९९२२९१२४३४

**ANTARRASHTRIYA PRARTHANAYOG MANDAL, SOLAPUR**

**MAHATAPASVI SHRI KUMARSWAMIJI YOG-VIHAR**

**FOUNDER : LATE SHRI RAJSHEKHAR MADAKI**

राजेंद्र मायनाळ
अध्यक्ष
मोबा.९९२२९१२४३४

निलकंठप्पा कोनापूरे
उपाध्यक्ष
मोबा.९०९६४९९१२९

बाबासाहेब कुलकर्णी
सचिव
मोबा.९७६३३५५६४९


जावक                                                                 दिनांक :   /   /२०

**।। हे प्रभो प्रसीद ओम।।**

प्रति

मुख्याध्यापक/प्राचार्य/संस्थाचालक/श्री

-----------------------------------

-----------------------------------

**विषय: परम पूज्य महातपस्वी श्री कुमार स्वामीजी यांच्या जीवन चरित्र या ग्रंथावर विद्यार्थ्यांसाठी परीक्षा आयोजित करण्याबाबत.....**

महोदय,

परम पूज्य महातपस्वी श्री कुमार स्वामीजी हे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे योग महर्षी होते. स्वामीजी वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले बहुआयामी दुर्मिळ असे संत होते. त्यांनी लययोग, मंत्रयोग, राजयोग, हटयोग, शिवयोग, लंबीकायोग, कुंडलिनी योग, अवगत करून त्यामध्ये प्राविण्य मिळवले होते. प्रार्थनायोगाचे ते प्रणेते होते. **"हे प्रभो प्रसीद ओम"** दृगोचराने प्राप्त झालेला सप्ताक्षरी महामंत्राची साधना सर्वसामान्यांना दिली. प्रार्थना योगामध्ये त्यांनी आसन, मुद्रा, बंध, प्राणायाम, मंत्रयोग या सर्वांचा वैज्ञानिक मेळ घालून प्रभावी अशी सुलभ साधना सर्वसामान्यांना दिली. त्यामुळे अनेक भक्तांना आरोग्य,मनशांती, भौतिक लाभ झाल्याचे अनुभव आहेत. तसेच स्वामीजीनी शिवयोग साधना वैज्ञानिक दृष्टिकोनातून शिकविली, यामध्ये चुंबकीय शक्ती व विद्युत शक्ती कशी काम करते त्यायोगे पिट्युटरी ग्रंथी(pitutory gland)आणि पियुष ग्रंथी ( pineal gland) कसे जागृत होतात हे सांगितले. त्यामुळे निर्माण होणारी परमोच्च आनंदाची अवस्था व सहज प्राप्त होणारे आरोग्य इत्यादी माहिती देशातील व पाश्चिमात्य राष्ट्रातील साधकांना देणारे प्रथम भारतीय योगमहर्षी होत. स्वामी विवेकानंदा नंतर जगभर भारतीय संस्कृती व तत्त्वज्ञान प्रसार त्यांनी जगभर केला व योगशास्त्राची ओळख जगाला करून दिली. सहा वेळा युरोपियन देशाचे दौरे त्यांनी केले. त्यामध्ये इंग्लंड, फ्रान्स, स्विझर्लंड, बेल्जियम , हॉलंड व इटली देशांचे दौरे केले तेथे प्रभावशाली व्याख्याने देऊन भारतीय संस्कृती विषयी जागृती निर्माण केली. ते उत्तम वक्ते, कवी, लेखक होते. त्यांचे इंग्रजी, कन्नड, हिंदी या भाषेवर प्रभुत्व होते. ते राज्यशास्त्र घेऊन विदयापीठात प्रथम आले, तथापि त्यांना

समाज शास्त्र, नीतिशास्त्र,भौतिकशास्त्र, शरीरशास्त्र, अणू विज्ञान इ. अवगत होते. खडतर तपश्चर्येदवारे त्यांना अद्भुतशक्ती, असाधारण व्यक्तिमत्व लाभले होते, ते कुशाग्र बुद्धीचे महामानव होते. त्यांचे इंग्रजीमध्ये 18 कन्नडमध्ये 11 व हिंदी मध्ये 1 ग्रंथ लिहिलेले आहेत. टेक्निक ऑफ ओपनिंग थर्ड आय, डायमेन्शन्स ऑफ योगा, रिलिजन ऑफ ह्युमानिटी, वीरशैव फिलॉसॉफी अँड मिस्टीसिजम, ॲनाटोमी ऑफ मॅन अँड गॉड इत्यादी ग्रंथाचा समावेश आहे.

**व्हॅटिकन सिटी मध्ये ख्रिश्चन धर्माचे सर्वोच्च धर्मगुरू पोपपॉल जॉन द्वितीय यांनी त्यांना आदराने आमंत्रित केले होते, स्वामीजींनी त्यांना ईस्टलिंग भेट म्हणून देऊन शिवयोग हा तृतीय नेत्र उमलण्याचा सुलभ व सुंदर विधायक मार्ग असल्याचे त्यावेळेस सांगितले आणि पोपपॉल यांना ईस्टलिंगाची अनुभूती झाली. रोम येथील अत्यंत भव्य अशा सेंट पीटर चर्चला भेट देऊन हिंदू संस्कृती, शिवयोग, ख्रिश्चन धर्माचे तत्व याविषयी आपले विचार प्रकट केले ख्रिश्चन धर्माचा सखोल अभ्यास पाहून तेथील पादरी लोक ही चकित झाले होते सन १९७२ मध्ये पॅरिस येथे जागतिक सर्वधर्म संमेलन स्वामीजींच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आले होते.**

**१८ मे १९८८ रोजी दिल्ली येथे विश्वधर्म संसद या आंतरराष्ट्रीय संस्थेच्या वतीने स्वामीजींचा परम धर्मचक्र प्रधान करून सन्मान करण्यात आला होता. सन १९७० मध्ये दिल्ली येथील विज्ञान भवनामध्ये जागतिक विज्ञान व योग परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये योगी जणांना व वैज्ञानिकांना या परिषदेमध्ये प्रथमच आमंत्रित करण्यात आले होते. या परिषदेमध्ये स्वामीजींना पाच व्याख्याने देण्याची संधी मिळाली.**

स्वामीजींनी लिहिलेल्या ग्रंथाची अनेक भारतीय तसेच विदेशी तत्त्ववेत्ते, विचारवंत , लेखक, राजकारणी, वैज्ञानिक, धर्मगुरू अशा असंख्य लोकांनी प्रशंसा केली आहे त्यामध्ये डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन, धर्मगुरू दलाई लामा, डॉ. राष्ट्रपती शंकरदाय शर्मा, श्री श्री रविशंकर बेंगलोर , शिवानंद महाराज, ऋषिकेश, पद्मभूषण एम. सी. मोदी, श्री सिद्धेश्वरस्वामीजी, वैराग्य शिरोमणी ज्ञानयोग आश्रम, विजयपूर इत्यादी विदवानांचा समावेश होतो. भारता बाहेरील अनेक परदेशी शिष्यगण स्वामीजी कडून दीक्षा घेतली आहे. स्वामीजींनी नोव्हेंबर ७७ मध्ये स्पिरिच्युअल अँड योग सोसायटी या संस्थेचे स्थापना धारवाड येथे केली.

**"सारे विश्व एक मंदिर असून प्रत्येक माणसाच्या ह्रदयात तेवत असलेली आत्मज्योत म्हणजेच परमेश्वर होय. निष्काम सेवा ही खरी पूजा आहे. सर्वांचे कल्याण हीच माणसाची मुक्ती आहे." अशी स्वामींची विचारधारा होती, हे त्यांनी आपल्या अनेक प्रवचनातून, ग्रंथातून आणि लेखनातून प्रतिपादन केले आहे.**

"महातपस्वी श्री कुमार स्वामीजी जीवन व कार्य" या ग्रंथाचे लेखन मी केलेले आहे. या ग्रंथ लिखाणाचा मुळ उद्देश स्वामीजींचे तत्त्वज्ञान, विचार यांचा प्रचार, प्रसार करणे हा असून स्वामीजींच्या कार्याची ओळख आधुनिक तरुण पिढीस व्हावी हा आहे. अगदी कमी कालावधीत या ग्रंथाच्या चौथ्यावृत्तीचे प्रकाशन 15 ऑगस्ट 2025 रोजी करण्यात आले आहे. विशेष म्हणजे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विदयापीठाचे कुलगुरु डॉ. मृणालिनी




Estd. 1964

।। हे प्रभो प्रसीद ॐ ।।

Public Trust Regd No. A779 (S)

# आंतरराष्ट्रीय प्रार्थनायोग मंडळ, सोलापूर

इंदिरा नगर पोस्ट ऑफिसजवळ, विजापूर रोड, सोलापूर – ४१३ ००४.
फोन : (०२१७) २६०७१९८. मो.९९२२९१२४३४

## ANTARRASHTRIYA PRARTHANAYOG MANDAL, SOLAPUR

MAHATAPASVI SHRI KUMARSWAMIJI YOG-VIHAR

FOUNDER : LATE SHRI RAJSHEKHAR MADAKI

| राजेंद्र मायनाळ<br>अध्यक्ष<br>मोबा.९९२२९१२४३४ | निलकंठप्पा कोनापूरे<br>उपाध्यक्ष<br>मोबा.९०९६४९९१२९ | बाबासाहेब कुलकर्णी<br>सचिव<br>मोबा.९७६३३५५६४९ |
|---|---|---|


जावक

दिनांक : / /२०

फडणवीस यांनी परिपत्रक काढून सर्व शाळा व विदयापीठांना ग्रंथ घेण्याचे आव्हान केले आहे. या परिपत्रकाची प्रत या सोबत जोडत आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे या ग्रंथ विक्रीतून मिळणारा सर्व निधी सोलापूर येथील योगविहार या आश्रमाच्या विकासासाठी उपयोगात येणार आहे. आतापर्यंत अनेक शाळा महाविदयालयाने ग्रंथ खरेदी करून सहकार्य केले आहे.

सध्या समाजात नैतिक मूल्याचा ऱ्हास होत आहे. त्यामुळे विदयार्थ्यांना त्यांच्या जीवनात नैतिक मूल्ये रुजावीत त्यांचे जीवन समृद्ध व्हावे, त्यायोगे निकोप समाजाची निर्मिती व्हावी या हेतूने आपण एक अभिनव उपक्रम राबविणार आहोत, त्यामध्ये महाविदयालयीन विदयार्थी व खुला गट तसेच प्रशालेतील आठवी इयत्ता ८वी व ९ वी विदयार्थी यांचा दुसरा गट राहणार आहे. सदरचा ग्रंथ हा अभ्यासक्रम असणार आहे . त्यासाठी 1000 विदयार्थ्यांच्या कडून परीक्षा घेऊन त्यांना प्रेरणा मिळण्यासाठी आकर्षक रकमेची बक्षिसे प्रशस्तीपत्रकासह देण्याचे ठरविले आहे.

आपल्या संस्थेकडून जास्तीत जास्त ग्रंथ खरेदी करून आपली मागणी नोंदवावी. प्रत्यक्षात ग्रंथाचे छपाई चे मूल्य रुपये 350 असून त्याचे देणगी मूल्य रुपये 250 ठेवण्यात आले आहे . संग्रही ठेवण्यायोग्य ग्रंथाची देणगी मूल्य आता सवलतीच्या दरात रुपये 200 करण्यात आली आहे, जेणेकरून विदयार्थ्यांना घेणे सोयीचे व्हावे. विदयार्थ्यांना प्रेरित करण्यासाठी आपल्या संस्थेकडून जास्तीत जास्त ग्रंथ घेऊन सहकार्य करावे ही विनंती. परीक्षेचे नियम व अटी यासोबत जोडले आहेत.

आपला स्नेहांकित,

(राजेंद्र मायनाळ)
अध्यक्ष
आंतरराष्ट्रीय प्रार्थनायोग मंडळ सोलापूर

( कृपया पाठीमागे पहा )

## ➢ परीक्षेचे नियम

1) परीक्षा लेखी स्वरूपाची  वस्तुनिष्ठ बहुपर्यायी/वर्णनात्मक स्वरूपाची असेल

2) प्रश्नपत्रिकाचा अभ्यासक्रम श्री राजेंद्र मायनाळ लिखित परमपूज्य महातपस्वी श्री कुमारस्वामीजी यांचे जीवन व कार्य या ग्रंथावर आधारित राहील.

3) परीक्षेचा दिनांक 28 डिसेंबर 2025

परीक्षेचे ठिकाण व वेळ नंतर जाहीर करण्यात येईल.

शक्यतो परीक्षेचे ठिकाण सोलापूर शहरात मध्यवर्ती ठिकाणी असणार आहे.

4) उत्तरपत्रिकेचे मूल्यमापन करून गुणवत्तेनुसार क्रमांक ठरविले जातील. परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.

5) परीक्षेची नोंदणी फी म्हणून स्वामीजींचे जीवन व कार्य हा ग्रंथ घेणे आवश्यक राहील ग्रंथाचे देणगी मूल्य रुपये 200 आहे .

6)  परीक्षार्थींनी त्यांची नावे दिनांक 15 पंधरा डिसेंबर 2025 पूर्वी शाळा/ महाविद्यालय/ आयोजित संस्था यांचेकडे नोंदविणे आवश्यक आहे.

7) परीक्षार्थींनी परीक्षेपूर्वी पंधरा मिनिटे हजर राहणे आवश्यक आहे.

8) निवड झालेल्या परीक्षार्थींना बक्षीसाची रक्कम व प्रशस्तीपत्र समारंभ पूर्वक प्रदान करण्यात येईल.

**9) संपर्क क्रं - 9922912434 / 9579710109**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)
दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७०/७१/७२/७३/७४ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,
संकेतस्थळ: http://sus.ac.in ई-मेल: Krc@sus.ac.in gmail.com विस्तारित क्र.: १२९
NAAC Accredited-2015 "B" Grade (CGPA 2.62)

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे ज्ञानस्त्रोत केंद्र

## परिपत्रक

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठ परिसरातील सर्व महाविद्यालयांना परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, राजेंद्र मायनाळ यांनी दि. २३/०९/२०२२ रोजीच्या मा. कुलगुरु महोदय यांना पाठविलेल्या पत्राव्दारे " **परमपूज्य महातपस्वी श्री कुमार स्वामी जीवन व कार्य** " हा ग्रंथ सर्व महाविद्यालयांनी खरेदी करण्यास तसेच सदरचा ग्रंथ सर्व महाविद्यालयीन ग्रंथालयामध्ये ठेवण्या करिता निवेदन केलेले आहे. सदर ग्रंथामध्ये महातपस्वी श्री कुमार स्वामी जीवन व कार्य याची माहिती उपलब्ध आहे. तरी सदरचा ग्रंथ सर्व महाविद्यालयांनी खरेदी करावा असे आवाहन करण्यात येत आहे.

कळावे,

3/11/22
(योगिनी घारे)
मा. कुलसचिव

जा.क्र. पुअहोसोविसो/ज्ञानस्त्रोत केंद्र/ 335 दि. 04 NOV 2022

प्रत :-
माहितीस्तव व कार्यवाहीसाठी.

१. मा. कुलगुरु महोदय यांचे कार्यालय
२. मा. प्र. कुलगुरु यांचे कार्यालय
३. मा. कुलसचिव कार्यालय
४. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये

**बक्षिसांची विभागणी (संयुक्त तक्ता)**

| बक्षिसाचा प्रकार | रक्कम (₹) | महाविद्यालयीन विद्यार्थी/खुलागट. बक्षिसांची संख्या | माध्यमिक शाळा इयत्ता ८वी व ९वी गट. बक्षिसांची संख्या |
|---|---|---|---|
| प्रथम बक्षीस | 10,000 | 1 | 1 |
| द्वितीय बक्षीस | 7,500 | 1 | 1 |
| तृतीय बक्षीस | 5,000 | 1 | 1 |
| स्मृती बक्षीस | 1,500 | 10 | 10 |
| साधना बक्षीस | 1,000 | 15 | 15 |

( राजेंद्र मायनाळ )
अध्यक्ष
आंतरराष्ट्रीय प्रार्थनायोग मंडळ
सोलापूर